**फौजदारी जामीन अर्ज क्र– ३९२/२०२२ दिपक नामदेव बाविस्कर वगैरे ६ वि।। म. शासन.**

## <u>आदेश निशाणी क्र. १</u>

१. अर्जदार/आरोपी क्र.१, दिपक नामदेव बाविसकर, उ.व. ४२,रा. सिध्दार्थ नगर, वार्ड नं. ५ कसारा, ठाणे २, श्रीमती विमलबाई नामदेव बाविस्कर, उ.व. ६६,रा. सिध्दार्थ नगर, वार्ड नं. ५ कसारा, ठाणे ३, विशाल नामदेव बाविस्कर, उ.व. ३६ रा. रूषभ अपा. बी – ६०१ सर्वोदय नगर, अंबरानाथ, प. जि. ठाणे – ४,वसुधा सुनिल गाडगे, वय ३८, रा. ७०३ शिव व्हॅली, खडकपाडा कल्याण– प, जि. ठाणे –५,सौ.सुनिता महेश जाधव, वय ४६, ६, महेश हरीभाउ जाधव, वय ५४सर्वोदय नगर, अंबरानाथ, प. जि. ठाणे व आरोपी क्र. ७, मिलींद बुधा बाविस्कर, रा. हातेड बु. चोपडा, जि. जळगांव. विरूध्द शहर पोलीस स्टेशन, चोपडा गुन्हा क्र.४३८/२०२२ भा.दं.वि. कलम४९८अ, ३२३,५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार गुन्हा नोंदविला. अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहितेचा कलम ४३८ खाली जामीन अर्ज दाखल केलेला आहे.

२. गुन्हयातील कथन थोडक्यात असे की, तक्रारदार ही आरोपी क्र. १ याची पत्नी असुन त्या दोघांचे लग्न दिनांक २५.५.२००८ या दिवशी चोपडा येथे झाले. लग्न संबंधातुन तक्रारदाराला जयश्री नावाची मलगी झाली आहे. लग्न झाल्यानंतर ती सासरी नांदायला गेली असता पती दिपक बाविस्कर, सासु विमलबाई बावीस्कर, दिर विशाल बाविस्कर, नंदत वसुधा व सुनिता, चुत जेठ मिलींद बाविस्कर असे एकत्र राहत असतांन तिला सहा ते सात महिने चांगले वागविले व छोटया मोठयाकारणवरून तीला त्रास दिला. पण आज ना उदया त्याचा वगण्यात बदल होईल म्हणुन फिर्यादी त्याचासोबत नांदली.

3. फिर्यादीच्या दोन्ही नणंद वसुधा आणि सुनिता त्यांचा लग्न झाल्यानंतर तीच्या घरी नेहमी येत व फिर्यादीला घरकाम येत नाही म्हणुन शिवीगाळ करत असत. दिर विशाल बावीस्कर, चंलत जेठ मिलींद बाविसकर हे सुध्दा घरी आल्यानंतर तुझे माहेरी एखादया मुलासोबत प्रेमसंबंध असतील म्हणुन तीच्या चारीत्रयावर संशय घेवून तीला शारीरीक व मानसिक त्रास देत असत. तीच्या पतीला तिच्या विरूद उत्तेजीत करत असत.

४. त्यानंतर वडीलांनी पैसे दिले म्हणुन तीचा पती तीला उल्हासनगर येथे घेवून गेला व एक वर्ष तीला तीथे नांदविले पण या काळात पण तीला सर्व आरोपी मानसिक व शारीरिक त्रास तीच्या चारीत्रयावर संशय घेवून करत असत.

५. त्यानंतर आरोपी क्र. १ ने नोकरी सोडुन जळगांव लाआला व तीच्या आईवडीलांशी भांडण करून कसारा या ठिकाणी गेला. आरोपींना फिर्यादी व तीच्या आईवडीलांनी समजावुन सांगितले पण त्यांचा वागणुकीतुन फरक पडला नाही ते तीला जिवे मारण्याची धमकी देत असत. दिनांक १३.१०.२०२१ या दिवशी फिर्यादीची आरोपी विरूध्द तक्रार महिला दक्षता समिती या ठिकाणी चालु असतांना फिर्यादीचे सासरे यांनी फिर्यादीस चापट बुक्याने गालावर व कानावर मारहाण केली व सर्व आरोपींनी फिर्यादीला माहेरुन १० हजार रूपये घेवून ये म्हणुन शारीरिक व मानसिक त्रास दिला. म्हणुन फिर्यादीने आरोपी विरूध्द तक्रार दाखल केली. तीच्या तक्रारी नुसार आरोपींवर गुन्हा नोंदविण्यात आला.

६. अर्जदार /आरोपीचे म्हणणे असे की, अर्जदार /आरोपींवर केलेले आरोप चुकीचे आहेत. अर्जदार क्र. २ विमलबाई, कसारा शहारापुर येथे राहते. अर्जदार क्र. ३ विशाल हा अंबरनाथ, प. जि. ठाणे येथे राहतो. अर्जदार क्र. ४ वसुध नणंद ही कल्याण, जि. ठाणे या ठिकाणी राहते. अर्जदार क्र. ५ दुसरी नणंद सुनिता व अर्जदार क्र. ६ महेश हिचा पती हे दोघेही अंबरनाथ प. या ठिकाणी राहतात. अर्जदार क्र. ७ मिलींद बाविस्कर हा हातेड बु. या ठिकाणी राहतो. कोणीही अर्जदार क्र. १ व फिर्यादीसोबत राहत नाही. अर्जदार क्र. ३ व ६ हे दोघे पोलीस असुन ते ठाणे जिल्हयात राहतात. अर्जदार क्र. ४ व ५ हया विवाहीत नणंद आहेत. त्या दोघी

लग्न झाल्यानंतर त्यांचा पतीकडे ठाणे जिल्हयात राहतात. अर्जदार क्र. १ ची आई विमलबाई ही सिध्दार्थ नगर, कसारा, जि. ठाणे या ठिकाणी राहते. त्याचा फिर्यादीशी काहीही संबंध नाही. त्याचा विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. अर्जदार क्र. ७ हा चुलत दिर आहे. तो अर्जदाराचे पती, अर्जदार क्र. १ चा कुटूंबाचा भाग नाही म्हणुन या सर्वांना अटकपुर्व जामीनावर सोडण्यात यावे.

७. त्यांचे पुढे असेही म्हणणे आहे की, आरोपी क्र. १ दिपक हा पण कसारा येथे आपल्या आईसोबत राहतो. त्याने फिर्यादीस कोणताही त्रास दिला नाही. गुन्हयाचे स्वरूप लक्षात घेता त्याला सुध्दा अटक पुर्व जामीन देण्यांत यावे.

८. सरकारी वकील श्री. बागुल यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले व त्या म्हणण्यानुसार गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा आहे. आरोपीची चौकशी करावयाची आहे म्हणुन अटकपुर्व जामीन नामंजुर करावा.

९. मी दोन्ही बाजुंचे कथन वाचले, फिर्याद वाचले, आरोपीचे वकील तुषार सोनवणे तसेच सरकारी वकील श्री. के. आर. बागुल यांचा युक्तीवाद सविस्तरपणे ऐकला. त्या दोघांचा युक्तीवाद हा त्यांचे कथनाप्रमाणे आहे. त्यामुळे तो पुन्हा इथे नमुद करणे आवश्यक नाही.

१०. मी इथे नमुद करू इच्छीतो की, गुन्हा हा कौटूंबीक वादाचा परीणाम आहे. आरोपी क्र. २ ते ७ यांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्राथमिक दृष्टया

गुन्हयात सहभाग दिसत नाही. गुन्हयामध्ये जास्तीत जास्त शिक्षा ही तीन वर्षाची आहे. गुन्हा हा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी चालविण्याजोगा आहे. जरी तो अजामीनपात्र असला तरी त्याचा चौकशीसाठी आरोपीची कस्टडी आवश्यक नाही. म्हणुन आरोपींना अटकपुर्व जामीनावर न सोडण्यास कोणतेही कारण नाही. ही बाब लक्षात घेूवन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्जदार/आरोपी क्र.१, दिपक नामदेव बाविसकर, उ.व. ४२,रा. सिध्दार्थ नगर, वार्ड नं. ५ कसारा, ठाणे २, श्रीमती विमलबाई नामदेव बाविस्कर, उ.व. ६६,रा. सिध्दार्थ नगर, वार्ड नं. ५ कसारा, ठाणे ३, विशाल नामदेव बाविस्कर, उ.व. ३६ रा. रूषभ अपा. बी – ६०१ सर्वोदय नगर, अंबरानाथ, प. जि. ठाणे – ४,वसुधा सुनिल गाडगे, वय ३८, रा. ७०३ शिव व्हॅली, खडकपाडा कल्याण– प, जि. ठाणे –५,सौ.सुनिता महेश जाधव, वय ४६, ६, महेश हरीभाउ जाधव, वय ५४सर्वोदय नगर, अंबरानाथ, प. जि. ठाणे व आरोपी क्र. ७, मिलींद बुधा बाविस्कर, रा. हातेड बु. चोपडा, जि. जळगांव. विरूध्द शहर पोलीस स्टेशन, चोपडा गुन्हा क्र.४३८/२०२२ भा.दं.वि. कलम४९८अ, ३२३,५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार अटक पुर्व जामीनावर सोडण्यात येत आहे. जर

आरोपींना अटक झाली तर त्यांना ताबडतोब १५०००/- जात मुचलक्यावर व वैयक्तीक जात मुचलक्यावर ताबडतोब सोडण्यात यावे.

२. आरोपी क्र. १ दिपक नामदेव बाविस्कर याने गुन्हयाचा तपास पुर्ण होईपर्यंत दर रवीवारी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत चोपडा शहर पोलीस स्टेशन या ठिकाणी हजर राहावे व चौकशीस सहकार्य करावे.

३. आदेशाची प्रत संबंधीत पोलीस स्टेशनला पाठविण्यात यावी.

(पी. आर. चौधरी)

दिनांक २१.११.२०२२

जिल्हा न्यायाधीश-२ व

अति. सत्र न्यायाधीश, अमळनेर.